MHST200026852020	दावा दाखल तारीख	:	१६/०८/२०१९
	दावा नोंद तारीख	:	२९/०८/२०१९
	दावा निकाल तारीख	:	१०/०६/२०२६
	कालावधी	:	वर्षे महिने दिवस ०६ ०९ २६

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ **स्तर, वाई यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : एस. बी. गणपा)

विशेष दिवाणी दावा क्र.४८५/२०२३ **निशाणी क्र.४४**

(जुना वि.दि.दा.क्रं.२७०/२०१९)

श्री. कुंडलिक त्रिंबक मलगुंडे
वय – ५० वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा. } **वादी**

विरुद्ध

१. **श्री. सुरेश सोमनाथ भिसे**
वय – ४० वर्षे, व्यवसाय – शेती,
२. **श्रीमती अंजुबाई सोमनाथ भिसे**
वय – ६३ वर्षे, व्यवसाय – घरकाम व शेती,
३. **श्री. संजय सोमनाथ भिसे**
वय – ४८ वर्षे, व्यवसाय – शेती,
४. **श्री. मोहन सोमनाथ भिसे**
वय – ५३ वर्षे, व्यवसाय – शेती,
५. **कु. रोहित अर्जुन खरात**
वय- २७ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
६. **कु. अश्वीनी अर्जुन खरात**
वय – २५ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
प्र.वादी क्र.१ ते ४ रा. विनायकराव शेळके
पाटील वस्ती, लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा.
प्रतिवादी क्र.५ व ६ रा. वडुज,
ता.खटाव, जि.सातारा. } **प्रतिवादी**

दावा - कराराची पुर्तता करुन मिळणेकामी किंवा मोबदल्याची रक्कम व्याजासह परत मिळण्याकरीता.

T 010 612 6

===

वादीतर्फे विधिज्ञ	- श्री. ओ. ए. वाकनीस
प्रतिवादी क्रं.१ ते ६ तर्फे विधिज्ञ	- एकतर्फा

===

न्यायनिर्णय

(दिनांक १० जुन २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा दावा वादीने कराराची पुर्तता होवुन मिळण्याकरीता किंवा मोबदल्याची रक्कम व्याजासह परत मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. **दावा मिळकत :-**

मौजे लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा येथील सर्वे नं.२७०/१, क्षेत्र ० हे ६३ आर, आकार ३ रु. २८ पै. यापैकी प्रतिवादी क्र.१ याचे हिश्श्यापैकी ० हे ०३ आर क्षेत्र याची चतु:सिमा पुर्वेस - लोणंद-पिंपरे बु. रस्ता, दक्षिणेस - सदर सर्वे नंबरपैकी उर्वरीत जमीन, पश्चीमेस - सदर सर्वे नंबरपैकी उर्वरीत जमीन व उत्तरेस – श्री. दशरथ बाबुराव भिसे यांची जमीन अशा आहेत. येणेप्रमाणे तदंगभुत वस्तुसह मिळकत ही दाव्याचा वादविषय आहे. (सदर मिळकतीला इथुन पुढे सोईकरीता "दावा मिळकत" असे संबोधण्यात येते.)

३. **दाव्यातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे -**

दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ व इतर प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मिळकत असुन त्यामध्ये प्रतिवादी यांचे एकत्रीत असे अंदाजे ३१ आर क्षेत्र आहे. सदर मिळकत पुर्वी प्रतिवादी क्र.३ याचे नावे ए.कु.मॅ. म्हणुन नोंदविली होती. प्रतिवादी क्र.१ यास प्रापंचिक अडचण व घरखर्च भागविणेसाठी तसेच लोकांची देणी भागविणेसाठी रकमेची आवश्यकता असल्याने त्याने दावा मिळकत विक्रीस काढली. वादी हा प्रतिवादी यांचा दुरचा नातेवाईक असल्याने व दावा मिळकत वादी याचे घरासमोरील असल्याने वादीने प्रतिवादी क्र.१ याचेकडे खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली. सन २०११ चे दरम्यान प्रतिवादी क्र.१ याची घरगुती अडचण निवारणेसाठी वेळोवेळी रक्कम रु.१,२५,०००/- अदा केले. सदर मिळकत खरेदी घेणेच्या हेतुने विसार म्हणुन

10/06/26

दिलेल्या रकमेवेळी प्रतिवादी यांनी दावा मिळकत वादीस विकणार असलेबाबत खात्री व भरवसा वादीस दिला होता. नोव्हेंबर २०११ मध्ये वादी व प्रतिवादी यांचेमध्ये चर्चा होऊन प्रतिवादी क्र.१ याने वादी यांना दावा मिळकतीचे साठेखत दि.२२.११.२०११ रोजी दोन साक्षीदारांसमक्ष लिहुन दिले. सदर साठेखतानुसार वादी यांनी दावा मिळकतीची खरेदी रक्कम ₹.१३,५०,०००/- चे मोबदल्यापोटी करणेची होती. त्यानंतर दावा मिळकतीचे अभिलेख अदयावत करुन, पुनर्वसन खात्याची परवानगी घेवुन प्रतिवादी क्र.१ याने वादीस दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देणेचे होते. सदर खरेदीचे व्यवहारापोटी दि.२२.११.२०११ रोजी साठेखताच्या मोबदल्यापोटी वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यास वेळोवेळी रोख रक्कम ₹.१,२५,०००/- अदा केलेले होते. असे असताना प्रतिवादी क्र.१ याने मुदतीत साठेखताप्रमाणे खरेदीखत करुन देण्यास कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत.

४. प्रतिवादीने वादीस साठेखताचे दिवसापासुन सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन दि.३०.०१.२०१२ चे आत करुन देणेचे होते. परंतु, प्रतिवादी क्र.१ याने वेळोवेळी आश्वासन देवुन वादी यांनी रक्कम घेतली व सदर रक्कम घेतलेबाबत दि.२७.०५.२०१३ रोजी लेख लिहुन दिला. सदर लेखामध्ये दि.२२.११.२०११ रोजीचे साठेखतामधील मजकुर मान्य करुन दि.२७.०५.२०१३ रोजीपर्यंत प्रतिवादी क्र.१ याने वादीकडुन एकुण रक्कम ₹.३,५०,०००/- खरेदीखताचे मोबदल्यापोटी मिळाल्याचे मान्य केले. सदर साठेखतावरील व करारपत्रावरील साक्षीदार एकच आहेत. सदरचा लेख लिहुन दिलेनंतर प्रतिवादी क्र.१ याने वादीस दावा मिळकत खरेदी देणेबाबत खात्री व भरवसा दिला होता. सदरचा लेख लिहल्यानंतर प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार कै.बाळुताई अर्जुन खरात यांची नावे अभिलेखसदरी फेरफार नोंद क्रं.९४९८ ने झाली. सदरची माहिती वादी यांना जुन महिन्यात मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांना भेटुन खरेदीखताचा भाग पुर्ण करुन देणेविषयी विचारणा सन २०१९ चे जुलै महिन्यात केली व खरेदीखतापोटी देण्याची उर्वरीत रक्कम तयार असल्याचे सांगितले. परंतु प्रतिवादी क्र.१ याने घरगुती वाटपाची अडचण अदयाप दुर झाली नसल्याची खोटी सबब सांगुन वादीस खरेदीखत करुन देणेविषयी टाळाटाळ केली. त्यामुळे वादीने

हस्ताक्षर 10106126

दि.०९.०७.२०१९ रोजी त्याचे वकिलांमार्फत प्रतिवादी क्र.१ यास नोटीस पाठविली व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना माहिती म्हणुन नोटीस पाठविली. सदर नोटीस प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दि.११.०७.२०१९ रोजी मिळाली. मात्र सदर नोटीसीस प्रतिवादी यांनी उत्तर दिले नाही. त्यामुळे, वादी यास सदरचा दावा दाखल करणे भाग पडले. सबब, वादीची अशी विनंती आहे की, दावा खर्चासह मंजुर करण्यात यावा.

५. प्रतिवादी क्रं.१ ते ६ हे समन्सची बजावणी होऊन देखील गैरहजर राहिल्याने सदर दावा त्यांच्याविरुद्ध एकतर्फा चालविणेत आला.

६. वादीचे कथन व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांस अनुसरुन खालील वादप्रश्न निश्चीत करण्यात आले आहेत. सदर वादप्रश्नांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहेः

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१)	वादी असे सिद्ध करतो का की, प्रतिवादी क्रं.१ याने दि.२२.११.२०११ रोजी रक्कम ₹.१,२५,०००/- स्वीकारुन दावा मिळकतीचे साठेखत करुन दिले होते ?	होकारार्थी
२)	वादी असे सिद्ध करतो का की, तो त्याच्या बाजुच्या कराराची पुर्तता करण्यास सदैव तयार होता व आहे ?	नकारार्थी
३)	वादी हा दि.२२.११.२०११ रोजीच्या कराराची पुर्तता करुन मिळणेस पात्र आहे काय ?	नकारार्थी
४)	वैकल्पीकरित्या, वादी हा विसारादाखल दिलेले पैसे व्याजासह परत मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ?	होकारार्थी, प्रतिवर्षी ६% दराने
५)	आदेश व हुकूमनामा काय ?	दावा अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

<u>कारणमिमांसा</u>

७. वादीने त्याचा तोंडी पुरावा नि.क्र.२७ ला दाखल केला आहे. तसेच वादीने साक्षीदार क्र.२ किरण सोमनाथ खताळ यास नि.क्र.३७ व साक्षीदार क्र.३ बापु

10106126

पाटील संभाजी धायगुडे यास नि.क्र.४२ वर तपासले. तोंडी पुराव्याच्या पुष्टयर्थ वादीने दावा मिळकतीचे ७/१२ उतारे अनुक्रमे नि.क्रं.५ व ६, प्रतिवादी क्र.१ यास पाठविलेली नोटीस नि.क्र.२८, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना नोटीस पाठविलेल्या पोष्टाच्या पावत्या अनुक्रमे नि.२९ ते ३२ व नोटीस मिळालेल्या पावत्या अनुक्रमे नि.क्र.३३ ते ३६ इ. कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. वादीने नि.क्रं.४३ वर पुरावा बंद पुरशीस दाखल केलेली आहे.

८. वादीतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

मुद्दा क्र.१ करीता -

९. वादीने शपथेवर नमुद केले की मौजे लोणंद येथील सर्वे क्र.२७०/१ मध्ये प्रतिवादींच्या कुटूंबाची वडिलोपार्जित जमीन होती व आहे. प्रापंचिक अडचण व घरखर्च भागविण्यासाठी प्रतिवादी क्र.१ याने वर नमुद वडिलोपार्जित जमिनीपैकी त्याचा अविभक्त हिस्सा क्षेत्र ३ आर म्हणजेच वाद मिळकत विक्रीस काढली होती. वाद मिळकत वादीच्या घरासमोर असल्याने वादीने प्रतिवादी क्र.१ यास वाद मिळकत खरेदी करण्याची इच्छा व्यक्त करुन सन २०११ च्या दरम्यान अडचण निवारणेसाठी वेळोवेळी १,२५,०००/- रुपये प्रतिवादी क्र.१ यास वादीने अदा केले. त्यावेळी प्रतिवादी क्र.१ याने वाद मिळकत वादीस विकणार असल्याबाबत खात्री व भरवसा दिला. तदनंतर नोव्हेंबर २०११ मध्ये चर्चा होऊन वाद मिळकत खरेदीची रक्कम ₹.१३,५०,०००/- ठरली. तसेच अभिलेख अदयावत करुन, पुर्नवसन खात्याची परवानगी घेऊन प्रतिवादी क्र.१ याने उर्वरीत रक्कम स्वीकारुन वादीस वाद मिळकतीचे खरेदीखत लिहुन देण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे दि.२२.११.२०११ रोजी प्रतिवादी क्र.१ याने वादीच्या हक्कात दोन साक्षीदारांसमक्ष साठेखत लिहुन दिले. वाद मिळकत प्रतिवादींची वडिलोपार्जित असल्यामुळे त्या साठेखतावर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या संमत्ती देणार म्हणुन सहया घेतल्या आहेत. सदर साठेखताची पुर्तता दि.३०.०१.२०१२ च्या आत करुन देण्याचे ठरले होते. परंतु, मुदतीत प्रतिवादी क्र.१ याने कराराची पुर्तता करण्यास कोणतीच हालचाल केली नाही. याउलट, प्रतिवादी क्र.१ याने वादीकडुन गरजेप्रमाणे

10106126

दि.२७.०५.२०१३ रोजीपर्यंत एकुण ३,५०,०००/- रुपये मोबदल्यापोटी रक्कम स्वीकारुन दि.२७.०५.२०१३ रोजी दस्त लिहुन दिला आणि त्यात दि.२२.११.२०११ रोजीच्या साठेखतातील मजकुर मान्य व कबुल केला व वादीस वादमिळकत खरेदी देण्याबाबत भरवसा दिला.

१०. त्यानंतर वाद मिळकतीस प्रतिवादींचे पुर्वहक्कदार नामे बाळुताई अर्जुन खरात यांच्या नावाची नोंद अभिलेखात झाल्याचे कळाल्यावर वादीने प्रतिवादी क्र.१ याची समक्ष भेट घेऊन कराराची पुर्तता करण्याची विनंती जुलै २०१९ मध्ये केली. मात्र, प्रतिवादी क्र.१ याने घरगुती वाटपाची अडचण अदयाप दुर झाली नसल्याचे सांगुन टाळाटाळ केली. म्हणुन वादीने वकिलामार्फत दि.०९.०७.२०१९ रोजी नोटीस पाठवुन उर्वरीत रक्कम घेवुन खरेदीखत करुन देण्याची विनंती केली. सदर नोटीस प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दि.११.०७.२०१९ रोजी मिळाली. तरीदेखील सदर नोटीसीस प्रतिवादींनी उत्तर दिले नाही.

११. साक्षीदार क्र.२ किरण सोमनाथ खताळ आणि साक्षीदार क्र.३ बापु पाटील संभाजी धायगुडे हे विवादीत दि.२२.११.२०११ आणि दि.२७.०५.२०१३ रोजीच्या दोन्ही दस्तांवरील साक्षीदार आहेत. त्यांनी देखील वादीच्या कथनाला पुष्टी मिळेल अशा बाबी त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केल्या.

१२. नि.क्र.४१ आणि नि.क्र.४० वरील करारनाम्यावरुन असे दिसते की, प्रतिवादी क्र.१ याने वाद मिळकत वादीस विक्री करण्याचे मान्य व कबुल करुन मोबदल्यापोटी एकुण रक्कम रुपये ३,५०,०००/- घेऊन उपरोक्त दस्त वादीच्या हक्कात वर नमुद दोन्ही साक्षीदारांच्या समक्ष लिहुन दिले. दोन्ही दस्तांवर लिहुन देणार म्हणुन प्रतिवादी क्र.१ सुरेश सोमनाथ भिसे, लिहुन घेणार म्हणुन वादी कुंडलिक मलगुंडे आणि साक्षीदार किरण खताळ व बापु पाटील धायगुडे यांच्या सहया दिसत आहेत.

१३. यावरुन हे स्पष्ट होते की, वादीच्या शपथेवरील कथनाला दोन स्वतंत्र साक्षीदारांचा तोंडी पुरावा जबाब आणि कागदोपत्री पुराव्यांची पुष्टी मिळत आहे. संधी देवुन देखील प्रतिवादी क्र.१ याने प्रकरणात हजर होऊन, लेखी कैफियत दाखल करुन,

10106126

साक्षीदारांची उलटतपासणी घेऊन, वादीच्या कथनाचा आणि दाखल कागदोपत्री पुराव्यांचे खंडन करण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. यावरुन उलटतर्क निष्कर्ष काढणे भाग दिसते की, जर वादीचे कथन खोटे असले असते तर निश्चीतपणे प्रतिवादी क्र.१ ने वादीच्या नोटीसीस उत्तर दिले असते किंवा किमान प्रकरणात हजर होवुन लेखी कैफियत दाखल करुन वादीच्या कथनास आव्हान केले असते. तसे न केल्यामुळे वादीचे कथन आणि दाखल एकंदरीत पुरावा स्वीकारणे भाग दिसते. म्हणुन, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीत आहे.

<u>मुद्दा क्र.२ करीता -</u>

१४. वादीने पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केले की, प्रतिवादी क्र.१ याने पहिले साठेखत दि.२२.११.२०११ रोजी लिहुन दिला होता. घरगुती वाटपाची अडचण आल्यामुळे त्या साठेखताची पुर्तता ठरलेल्या मुदतीत म्हणजेच दि.३०.०१.२०१२ रोजीच्या आत झाली नव्हती. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ याने दि.२२.११.२०११ रोजीचा साठेखत लिहुन दिल्याचे मान्य करुन दि.२७.०५.२०१३ रोजी दुसरा बेमुदत करारनामा लिहुन दिला. त्यानंतर जुलै २०१९ या महिन्यात वादीने प्रतिवादी क्र.१ कडे जावुन खरेदीखत करुन देण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र.१ याने खोटी सबब सांगुन खरेदीखत करुन देण्यास टाळाटाळ केली. म्हणुन वादीने प्रतिवादी क्र.१ यास कराराची पुर्तता करण्याकामी दि.०९.०७.२०१९ रोजी नोटीस पाठवुन कळविले.

१५. सदर नमुद पुराव्यावरुन असे दिसते की, दि.२७.०५.२०१३ रोजी दुसरा करारनामा लिहुन दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१ याने कराराची पुर्तता करण्याची विनंती करत थेटपणे दि.०९.०७.२०१९ रोजी म्हणजेच तब्बल सहा वर्षांनी केली. कराराची पुर्तता करुन मिळण्याकरीता वादीने सदर सहा वर्षाच्या कालावधी दरम्यान कोणताच प्रयत्न केलेला दिसत नाही. अशापरिस्थितीमध्ये केवळ वादीने शपथेवर नमुद केले म्हणुन तो कराराची पुर्तता करण्यास सदैव तयार होता असे म्हणता येत नाही. खरे पाहता, सहा वर्षाचा कालावधी हा खुप मोठा कालावधी आहे. जर वादी हा कराराची पुर्तता करुन घेण्यास इच्छुक असला असता तर निश्चीतपणे सदर सहा वर्षाच्या

10106126

कालावधी दरम्यान काय प्रयत्न केले त्याबाबत कथन करुन तत्सम पुरावा पटलावर आणला असता. परंतु, तसे झालेले दिसत नाही. म्हणुन मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविणेत येत आहे.

<u>मुद्दे क्र.३ व ४ करीता -</u>

१६. वादीने त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रात स्पष्टपणे नमुद केले की, मौजे लोणंद येथील सर्वे क्र.२७०/१ मधील प्रतिवादींच्या कुटूंबाची एकत्रीत ३१ आर क्षेत्र जमीन होती व आहे. त्यापैकी प्रतिवादी क्र.३ याने त्याचा अविभक्त हिस्सा वादीस विक्री करण्याचे मान्य करुन विसाराची रक्कम स्वीकारुन साठेखत लिहुन दिले होते. म्हणजेच, वाद मिळकत ही अदयाप प्रतिवादींची वडिलोपार्जित एकत्र कुटूंबाची मिळकत आहे. अशापरिस्थितीमध्ये निश्चीतपणे प्रतिवादी क्र.१ यास त्याचा हिस्सा कायदयाने विकता येतो. परंतु, जोपर्यंत प्रतिवादींच्या कुटूंबियांमध्ये रितसर सरस निरस मानाने वाटणी होवुन प्रत्यक्ष स्वतंत्र ताबा ज्याचा त्यांना मिळत नाही तोपर्यंत त्यांना तो विशिष्ट चतु:सिमेच्या आतील त्यांचा हिस्सा इतर सहहिस्सेदारांच्या संमतीशिवाय विकता येत नाही.

१७. प्रस्तुत प्रकरणात वाद मिळकत प्रतिवादी क्र.१ याच्या हिश्श्याला देण्यात आल्याबाबत कोणताही वाटणीदस्त पटलावर दाखल करण्यात आलेला दिसत नाही. नि.क्र.४१ वरील साठेखतात प्रतिवादी क्र.१ याच्या हिश्श्याचे ३ आर क्षेत्र चतु:सिमेसह स्वतंत्र कब्जा असल्याची बाब मान्य करुन प्रतिवादी क्र.२ अंजुबाई भिसे, प्रतिवादी क्र.३ संजय भिसे, प्रतिवादी क्र.४ मोहन भिसे यांनी सहया केलेल्या दिसतात. परंतु, त्यात प्रतिवादी क्र.१ व ३ यांची बहीण बाळुताई सोमनाथ भिसे हिची सही अथवा निशाणी अंगठा दिसुन येत नाही. अशापरिस्थितीमध्ये बाळुताई भिसे हिच्या परस्पर वाद मिळकत क्षेत्राचा स्वतंत्र ताबा वाटणी होवुन प्रतिवादी क्र.१ यास मिळाला असे म्हणता येत नाही. त्याकामी निश्चीतपणे वाटणीपत्र अथवा कोणतातरी तत्सम दस्त पटलावर आणणे अभिप्रेत होते असे दिसते. परंतु, तसा कोणताही वाटणीचा किंवा सर्व सहहिस्सेदाराने संमती दिल्याबाबत दस्त पटलावर दाखल करण्यात आलेला दिसत

10106126

नाही. त्यामुळे, वादपत्रात नमुद चतु:सिमेच्या आतील वादमिळकतीबाबत उर्वरीत रक्कम स्वीकारुन खरेदीखत लिहुन देण्याबाबत वादीच्या हक्कात आदेश पारीत करणे हे चुकीचे राहील. म्हणुन, वादी हा उर्वरीत रक्कम देवुन प्रतिवादी क्र.१ कडुन खरेदीखत लिहुन मिळविण्यास व वाद मिळकतीचा स्वतंत्र कब्जा मिळविण्यास पात्र नाही या मतास मी आलो आहे.

१८. एकंदरीत वर चर्चिलेल्या पुराव्यावरुन आणि नोंदविण्यात आलेल्या निष्कर्षावरुन हे स्पष्ट दिसते की, प्रतिवादी क्र.१ याने वाद मिळकत वादीस विक्री करण्याचे मान्य करुन मोबदल्यापोटी ३,५०,०००/- रुपये स्वीकारले. खरेदीखत लिहुन घेऊन स्वतंत्र कब्जा मिळविण्यास वादी हा पात्र दिसत नसल्यामुळे वादीने दिलेल्या मोबदल्याची रक्कम व्याजासह परत करण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित होईल या मतास मी आलो आहे.

१९. नि.क्र.४० वरील करारनाम्यावरुन असे दिसते की, घरगुती वाटपाची अडचण असल्यामुळे करार पुर्ततेची तारीख बेमुदत ठरली होती. सदर करारनामा दि.२७.०५.२०१३ रोजी लिहुन देण्यात आला होता. परंतु, कराराची पुर्तता करुन मिळण्याबाबत वादीने नोटीस मात्र दि.१०.०७.२०१९ रोजी म्हणजेच तब्बल सहा वर्ष विलंबाने पाठविली. खरे पाहता, त्यापुर्वीपासुन कराराची पुर्तता करुन घेण्याकरीता वादी हा प्रयत्न करु शकला असता. परंतु, त्याने विशेष प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही. अशापरिस्थितीमध्ये वादीच्या हक्कात व्याजाची रक्कम दि.१०.०७.२०१९ रोजीपासुन म्हणजेच कराराची पुर्तता करुन मिळण्याकरीता वादीने ज्यादिवशी नोटीस पाठविली होती त्या महिन्यापासुन मंजुर करणे न्यायोचित वाटते.

२०. कराराची पुर्तता न झाल्यास मोबदल्यापोटी दिलेल्या रकमेची परतफेड व्याजासह होणार किंवा कसे याबाबत कोणतीच अट दोन्ही दस्तांमध्ये नमुद दिसत नाही. अशापरिस्थितीमध्ये मोबदल्याची रक्कम परतफेड करेपर्यंत प्रतिवर्षी ६ टक्के दराप्रमाणे व्याज मंजुर करणे न्यायोचित होईल या मतास मी येवुन मुद्दा क्र.३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रं.४ चे निष्कर्ष होकारार्थी, प्रतिवर्षी ६ टक्के प्रमाणे व्याज असे

10/06/26

नोंदवित आहे.

मुद्दा क्र.५ करीता -

२१. वर नोंदविलेल्या निष्कर्षावरुन मुद्दा क्रं.५ चे निष्कर्ष म्हणुन खालील अंतीम आदेश पारीत करीत आहे :

आदेश

(१) दावा अंशत: खर्चासह मंजुर करण्यात येतो.

(२) करार पुर्ततेबाबतची वादीची मागणी फेटाळण्यात येते.

(३) प्रतिवादी क्र.१ याने मोबदल्यापोटी स्वीकारलेली रक्कम रुपये ३,५०,०००/- वादीस, माहे जुलै २०१९ पासुन प्रतिवर्षी ६ टक्के दराप्रमाणे व्याजासह, रक्कम परत करेपर्यंत देण्यात यावी.

(४) येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत व घोषित करण्यात आला.)

10/06/26

स्थळः वाई
दिनांकः१०/०६/२०२६

(एस. बी. गणपा)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वाई.